प्रकरण पहिले :

# हमालांचा अभ्यास : प्रास्ताविक

## - प्रकरण पहिले -

## हमालांचा अभ्यास - प्रास्ताविक

### समस्या प्रतिपादन :

स्वातंत्र्योत्तर काळात भारतामध्ये औद्योगिक विकासाच्या प्रक्रियेला गती मिळाली. पंचवार्षिक योजनांचा अवलंब १९५१ पासून सुरू झाला. शेती क्षेत्राच्या विकासाबरोबरच औद्योगिक क्षेत्रामध्ये विकास घडवून आणण्याचे उद्दिष्ट शासनाने ठेवले. त्यानुसार गेल्या ४५ वर्षांमध्ये देशाची औद्योगिक प्रगती घडून आली. आधुनिक तंत्रज्ञान व नवी अर्थव्यवस्था यांचा अवलंब हा औद्योगिकरणामध्ये अपरिहार्य ठरतो. किंबहुना, आधुनिक तंत्रज्ञानामुळे औद्योगिक विकासाला चालना मिळाली. औद्योगिक शहरांची निर्मिती झाली, तसेच जुन्या नगरांचे रूपांतर औद्योगिक शहरामध्ये झाले. शहरे उद्योगधंदयाचे केंद्र बनली. या औद्योगिकरणामुळे व्यापार, वाहतूक यामध्ये वाढ झाली. नवनवीन बाजारपेठांची निर्मिती झाली. व्यापार, वाहतूक, बाजारपेठा इ. औद्योगिक क्षेत्रे ही नव्या अर्थव्यवस्थेतील रोजगार निर्मितीची केंद्रे बनली.

औद्योगिकरणामुळे ग्रामीण समाजामध्ये परिवर्तन घडून आले. जुनी गृहोत्पादन पद्धती मोडकळीस आली. गृहोत्पादन पद्धतीतील बेकार लोक पुन्हा शेतीकडे वळले. वाढती लोकसंख्या व ग्रामीण बेकारी यामुळे निर्माण झालेला अतिरिक्त भार शेतीवर पडला. केवळ शेतीवर उपजीविका करणे अल्पभूधारक व भूमिहीनांना अशक्य बनले. हे लोक रोजगाराच्या शोधार्थ औद्योगिक शहराकडे वळले. औद्योगिक क्षेत्रामध्ये मिळेल ते काम स्वीकारले. औद्योगिक क्षेत्रामध्ये प्रामुख्याने प्रशासकीय, तांत्रिक आणि शारीरीक कष्टावर आधारलेल्या श्रमाचा रोजगार उपलब्ध

...२/-

होतो. परंतु संख्यात्मकदृष्टया विचार करता शारिरीक श्रमिक हे अधिक आहेत. शारिरीक श्रमावर आधारलेल्या कामगार वर्गामध्ये सुद्धा दोन प्रकार पडतात. एक, संघटित - संरक्षित कामगारांचा, की ज्यामध्ये शासनव्यवस्था, निमसरकारी आणि स्वायत्तसंस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग, खाजगी क्षेत्रातील मोठे उद्योग, लघुउद्योग अशा ठिकाणी मासिक पगारावर नेमलेल्यांचा समावेश होतो. दुसरा असंघटित - असंरक्षित कामगारांचा, की ज्यामध्ये बांधकाम मजूर, वीटभट्टी कामगार, घरकाम करणा-या मोलकरणी, स्वयंपाकी, दुकानामधील कामगार आणि हमाल इ. चा समावेश होतो. यापैकी काही कामगार हे मासिक पगाराच्या बोलीवर काम करणारे असतात. उदा. स्वयंपाकी, मोलकरीण, तर काही कामगार हे अनिश्चित मुदती साठी, पूर्णपणे हंगामी स्वरूपाचे असतात, उदा. ओझी उचलणारा हमाल, इमारत बांधकामामधील मजूर, संघटित क्षेत्रातील कामगार हा असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या तुलनेत अत्यल्प आहे. १९८१ च्या खानेसुमारीनुसार भारतात २२.२५ कोटी कामगार आहेत. यापैकी अवघे २ कोटी २८ लाख संघटित क्षेत्रात मोडतात, तर ७.४५ कोटी कामगार असंघटित क्षेत्रातील आहेत.

दोन्ही प्रकारातील बहुतांशी कामगार शारिरीक स्वरूपाचे कष्ट घेत असले तरी त्यांच्यामध्ये कामाच्या स्वरूपावरून संघटित - संरक्षित आणि असंघटित - असंरक्षित असा भेद करता येतो. संघटित क्षेत्रातील कामगारांचे कामाचे स्वरूप हे पूर्णतः भिन्न स्वरूपाचे आहे. सर्वप्रथम म्हणजे हा कामगार वर्ग कायदयाने संरक्षित आहे. कामगारांसाठी निर्मिलेला कायदा हा त्यांचे कामाचे स्वरूप, वेतन, वेळ, नुकसान

भरपाई, रजा, सुट्टया, कामावर घेणे व कमी करणे विषयीचे नियम इत्यादी बाबी स्पष्ट करतो. त्यामुळे कायद्याने संरक्षित असलेला कामगार कायदेशीर दाद मागू शकतो. संघटित क्षेत्रातील कामगारांना कामाचे स्वरूप, कामाची वेळ, मासिक वेतन इत्यादींचे निश्चित आश्वासन असते. त्याला पगारी रजा, पगारी सुट्टया उपलब्ध होऊ शकतात. कामाबरोबरच वेतनाची शाश्वती असते. निवृत्तीवेतन, भविष्यनिर्वाहनिधी यांची कायदयाने तरतूद केली आहे. त्याला कामावरून कमी करताना विनाचौकशी निर्णय घेतले तर न्यायालयामध्ये दाद मागू शकतो, आणि त्याला नुकसान भरपाई मिळू शकते.

वरील सर्व बाबींचा विचार करता हा कामगार वर्ग कामाच्या वेतनाच्या बाबतीत कायदयाने पूर्णत: संरक्षित आहे. त्याचबरोबर सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे या कामगारांचे कामाचे ठिकाण एकच असलेने किंबहुना एकाच ठिकाणी अधिकांश संख्येने कामगार काम करीत असलेने त्यांना संघटित होणे शक्य होते. संघटित शक्तीच्या बळावर ते मालकवर्ग व प्रशासकीय वर्ग यांच्यावर दबाव ठेवू शकतात. बदलत्या सामाजिक - आर्थिक परिस्थिती बरोबर आपले वेतन, कामाचे स्वरूप, अन्याय इ. बाबतीत बदल घडवून आणणे त्यांना संघटनेच्या जोरावर शक्य होते. म्हणून हा कामगार वर्ग संघटित - संरक्षित स्वरूपाचा आहे.

नेमकी याच्या उलट स्थिती हमाल, बांधकामावरील मजूर यांची आहे. या कामगारांना कायदयाचे संरक्षण नसते. हमालांसाठी कायदा झाला असला तरी सर्वव्यापी स्वरूपाचा नाही. कामाचे स्वरूप सर्वत्र सारखे आढळत नाही. तसेच, कामाच्या वेळा निश्चित असू शकत

नाहीत. "निश्चित काम व हमखास दाम", हे संघटित कामगारांच्या बाबतचे तत्व इथे लागू होऊ शकत नाही. कामाची शाश्वती नसलेने ते वेतनासाठी दाद मागू शकत नाहीत. निवृत्ती वेतन, पगारी रजा, सुट्टी इत्यादी सोयी संघटित कामगारांना उपलब्ध नाहीत. म्हणून हा कामगार असंरक्षित आहे. तसेच कामाचे ठिकाण प्रत्येक कामगाराचे वेगवेगळे असतात. त्यामुळे त्यांचे संघटन ही कठीण बाब आहे. संघटन नसलेने आपल्या मागण्या, न्याय - अन्याय ते समर्थपणे मांडू शकत नाहीत. या अर्थाने हमाल, मजूर, स्वयंपाकी, मालकरीण हे असंघटित - असंरक्षित कामगार आहेत.

संघटित - संरक्षित कामगार वर्गाने संघटनेच्या माध्यमातून शासन, न्यायव्यवस्था, संशोधक - अभ्यासक इत्यादींचे नेहमीच लक्ष वेधले आहे. त्यामुळे संघटित - संरक्षित कामगारांचा सामाजिक - आर्थिक अभ्यास वेगवेगळ्या दृष्टीकोनातून झाला आहे. शास्त्रीय पद्धतीला अनुसरुन त्यांच्या कामाचे स्वरुप, त्यांचे प्रश्न व त्यावरील उपाय या अनुषंगाने विविध स्वरुपाचे संशोधनपर लेखन झाले आहे. त्याच प्रमाणे कायदा, न्यायव्यवस्था इत्यादी माध्यमातून वेळोवेळी त्यांच्या प्रश्नांची, मागण्यांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न होत असतो.

या तुलनेत असंघटित - असंरक्षित कामगार वर्ग हा नेहमीच शासन, जनता - समाज, संशोधक - अभ्यासक यांच्याकडून उपेक्षित राहिला आहे. संघटन - बांधणीमधील अडथळ्यामुळे हा वर्ग समाज- पटलावरती संशोधक - अभ्यासक यांच्याकडून दुर्लक्षित राहिला आहे. जे काही साहित्य उपलब्ध आहे, ते इतर अभ्यासांच्या तुलनेत अत्यंत नाममात्र

...५/-

आहे. पैकी औरंगबादच्या मोलकरीण या असंघटित कामगारांचा डॉ. सुधा काळदाते यांनी केलेल्या अभ्यासाचा उल्लेख करता येईल. हया अभ्यासावरील "एका उपेक्षित समूहाचे समाजशास्त्रीय विवेचन" हा शोधनिबंध "समाज प्रबोधन पत्रिके"मधून [मार्च-एप्रिल १९८२] प्रकाशित झाला आहे.

हमालांच्या संदर्भात संशोधनकार्याचा आढावा घेता, हीच कमतरता प्रामुख्याने जाणवते. अत्यंत मोजके अभ्यास हमालांच्या संदर्भात झाले आहेत. यामध्ये प्रा. वसंत देशपांडे [१९८९], डॉ. अनिल अवचट [१९७५ व १९८०] यांचा उल्लेख करता येईल. या अभ्यासाबरोबरच श्री. आप्पा कोरपे [१९९२] या हमाल पंचायतीच्या कार्यकर्त्याने आत्मकथनातून हमालांचे प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच डॉ. बाबा आढाव यांनी "रविवार सकाळ" मधून [८-११-१९८७] लिहिलेल्या लेखाचा उल्लेख करता येईल.

## हमालांवरील साहित्याचा संक्षिप्त आढावा -

[१] प्रा. वसंत देशपांडे यांनी भारतीय शिक्षण संस्थेच्या माध्यमातून हमालांविषयी अभ्यासपूर्ण संशोधन करून "हमाल पंचायत" हे पुस्तक लिहीले आहे. जून १९८४ ते जानेवारी १९८५ च्या दरम्यान हा अभ्यास केला असून जुलै १९८९ मध्ये मुंबईच्या मौज प्रकाशनाने प्रकाशित केला आहे.

प्रामुख्याने प्रा. देशपांडयांचा अभ्यासविषय हमालपंचायत हा असला तरी संघटनेच्या अभ्यासाबरोबरच हमालांचे सामाजिक -

आर्थिक जीवन, त्यांच्या समस्या व त्यावरील उपाय याचे तपशीलवार विवेचन केले आहे. या बरोबरच असंघटित कामगार या अनुषंगाने हमाली कामासंदर्भातील कायदे व योजना, संघटना - उभारणीतील अडचणी, संघटना नेतृत्व, हमाल पंचायतीचे कार्य व यंत्रणा, हमाल पंचायतीचे विधायक उपक्रम यांचा आढावा घेतला आहे.

या अभ्यासासाठी प्रा. देशपांडे यांनी पुणे येथील औद्योगिक - व्यापार केंद्रे संशोधन क्षेत्र म्हणून निवडली आहेत. पुण्यामधील भवानीपेठ, नाना पेठ, गंज पेठ, सदाशिव पेठ, या व्यापारी पेठा व गुलटेकडी येथील बाजारपेठ याठिकाणच्या हमालांचा अभ्यास केला आहे. १९८४ साली हमालपंचायतीच्या सभासदांची संख्या ३१०० होती. पाहणीसाठी या सभासदांमधून २२० हमालांची निवड प्रा. देशपांडयांनी केली. एकूण सभासदांशी हे प्रमाण ७ ते ८ टक्के आहे.

प्रा. देशपांडयांच्या अभ्यासातून पुढील बाबी स्पष्ट होतात :-

## हमालांचे जातिनुसार वर्गीकरण :

प्रा. देशपांडयांच्या अभ्यासानुसार असे आढळून येते की, हमाली व्यवसायात मराठा व दलित जातींच्या व्यक्तींचे प्रमाण अधिक आहे. एकूण हमालांपैकी ५० टक्के हमाल मराठा जातीतील आहेत, तर दलित जातींचे ४५ टक्के आहेत.

BARR. ... EKAR LIBRARY
SHIVAJI ... KOLHAPUR

## हमालांचे वयोगटाप्रमाणे वर्गीकरण :

५० टक्के हमाल हे २५ ते ४० वयोगटातील आहेत. ३५ टक्के

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

हमाल ४१ ते ५० वयोगटातील आहेत. यावरून हेच स्पष्ट होते की अवजड शारीरीक श्रमामुळे व्यक्ती जास्त काळ काम करु शकत नाही.

## हमालांची आर्थिक परिस्थिती :

हमालांचे वार्षिक कुटुंब उत्पन्न मर्यादित आहेत. एकूण हमालांपैकी ५० टक्के हमालांचे वार्षिक कुटुंब-उत्पन्न ६०० रु. होते. म्हणजे दरमहा केवळ ५०० रु. तसेच ४४ टक्के हमालांचे वार्षिक कुटुंब - उत्पन्न रुपये ८,००० ते १२,००० च्या दरम्यान होते. एकूण हमालांमध्ये केवळ ६ टक्के हमालांचे वार्षिक उत्पन्न रुपये २०,००० होते. केवळ हमालीतील उत्पन्नाचा विचार करता ७६ टक्के हमालांचे वार्षिक उत्पन्न रु. ६,०००/- च्या आत होते. यावरून हे स्पष्ट होते की हमालांची मिळकत ही अत्यंत तुटपुंजी असते.

## सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी :

हमालांच्या आर्थिक परिस्थितीबरोबरच हमालांच्या सामाजिक -आर्थिक पार्श्वभूमीचा अभ्यास करून हमाली व्यवसायात प्रवेश करण्या मागील कारणे शोधण्याचा प्रयत्न प्रा. देशपांडयांनी केला आहे. सर्व हमाल ग्रामीण भागातून शहराकडे स्थलांतरीत झाले आहेत. ५० टक्के हमाल पुणे जिल्हयातील दुष्काळी भागातून कामाच्या शोधात आलेले आहेत. तर ४० टक्के हमाल सोलापूर, नगर, बीड, उस्मानाबाद या जिल्हयातून आले आहेत. हे सर्व जिल्हे मागासलेले, दुष्काळी व पाणी पुरवठयाच्या दृष्टीकोनातून अविकसित आहेत.

सामान्यत: हमाल हे भूमीहीन असतात असा समज आहे. परंतु अभ्यासावरून असे दिसून येते की ६१ टक्के हमालांची मूळ गावी जमीन आहे. ४१ टक्के हमालांची जमीन ५ एकरापर्यंत आहे. परंतु कोरडवाहू जमीन आणि शेतीवर अवलंबून असणाऱ्या कुटुंबसदस्यांची अतिरिक्त संख्या या कारणांमुळे हे लोक हमाली व्यवसायात आले आहेत.

## व्यसनाधीनता :

हमालांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण प्रकर्षाने जाणवण्याइतके आहे. सर्वच हमाल तंबाखू-विडीवर रोजी एक रुपया खर्च करतात, तर ३५ टक्के हमालांना दारूचे व्यसन आहे. अर्थात् यापेक्षाही अधिक प्रमाण असण्याची शक्यता वर्तविली आहे.

## शिक्षण :

हमालांच्या कौटुंबिक समस्यांपैकी निरक्षरता ही एक गंभीर समस्या आहे. अभ्यासावरून हे स्पष्ट होते की हमालांच्या कुटुंबामध्ये निरक्षरतेचे प्रमाण लक्षात घेण्याजोगे असून स्त्रियांमध्ये हे प्रमाण अधिक आहे. पुरुषांमध्ये ४५.७, तर स्त्रियांमध्ये निर्रक्षरतेचे प्रमाण ७८.३ टक्के होते. हमालांच्या नव्या पिढीचा आढावा घेता, शिक्षणाचा प्रसार होत असल्याचे दिसून येते. हमालांच्या मुलांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण २० टक्के होते.

## हमाल पंचायतीची भूमिका :

हमालांच्या सामाजिक - आर्थिक जीवनाच्या अभ्यासाबरोबरच

SARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
... KOLHAPUR

...९/-

हमाल पंचायत या संघटनेच्या यंत्रणा व उपक्रमाचा उल्लेख केला आहे. हमाल पंचायतीच्या स्थापनेने हमालांच्या असुरक्षित जीवनामध्ये व्यापारी, मध्यस्थ यांच्या पिळवणूकीपासून संरक्षण मिळाले आहे. कामावर घेण्याबाबतचे व काढून टाकण्याबाबतचे निर्णय हमालपंचायतीच्या संमतीनेच घेतले जातात. वेतनवाटपामधील भ्रष्टाचार हमालपंचायतीच्या प्रयत्नाने थांबला आहे. वेतन, कामाची वेळ, कामाचे स्वरूप हे निश्चित करण्या-बरोबरच हमालांसाठी संघटनेने कष्टाची भाकर, स्वस्त दवाखाना, हमालनगर, हमाल मजूर सहकारी संस्था, भाऊमेट इ. विधायक उपक्रम राबवून हमालांना स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रा. देशपांडयांचे संशोधन प्रामुख्याने हमाल पंचायत या संघटनेच्या अनुषंगाने असले तरी या संशोधनामध्ये हमालांच्या सामाजिक-आर्थिक समस्यांचा आढावा घेतला आहे. अभ्यासाच्या अंतिम विश्लेषणात हमालांच्या समस्येवरील उपाय सुचविताना लोकशिक्षण व जागृती या दोन बाबी महत्वपूर्ण मानल्या आहेत. वेतनवाढ, दर यापेक्षा हमालांना अधिक व पूर्ण वेळ काम पुरविणे हा प्रश्न त्यांना महत्वाचा वाटतो.

[२] सामाजिक कार्यकर्ते डॉ. अनिल अवचट यांच्या "माणसं" [१९७५ व १९८०] या पुस्तकामधील "कोण माणसं ..... कोणं जनावरं", हा लेख हमालांच्या सामाजिक - आर्थिक जीवनावर आहे. डॉ. अनिल अवचट यांनी हमालांच्या सामाजिक - आर्थिक जीवनाचा अभ्यास निरीक्षण व मुलाखतीच्या माध्यमातून केला आहे. यासाठी पुण्यातील भवानी पेठ, शिवाजीनगर, नाना पेठ, रेल्वे स्टेशन येथील गुदामांचे निरीक्षण केले

असून, प्रत्येक गोदामातील काही हमालांच्या प्रातिनिधीक स्वरूपात मुलाखती घेतल्या आहेत.

डॉ. अनिल अवचटांच्या हया लेखात एकूण पाच विभाग आहेत. पहिल्या विभागात, खाजगी गुदामांच्या परिस्थितीचा आढावा घेतला आहे. दुस-या विभागात, सरकारी गुदामांची स्थिती दिली आहे. तिस-या विभागात, हमाल पंचायत या संघटनेच्या कामकाजाचा आढावा घेतला आहे. चौथ्या विभागात, स्थलांतराची कारणे व हमालांच्या कौटुंबिक - सामाजिक जीवनाचा मागोवा घेतला आहे. शेवटचा विभाग हमालांच्या सामाजिक - आर्थिक उन्नतीसंबंधी उपायांचा आहे.

डॉ. अनिल अवचट यांना निरीक्षणांमधून असे आढळून आले की, हमालांचे कामाचे ठिकाण हे आरोग्याच्या दृष्टीने घातक असते. कामाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, स्वच्छता गृह, औषध-उपचार, प्रकाश इत्यादीची सोय नसते. गुदामातील धुळीच्या अधिक प्रमाणामुळे बहुतांशी हमाल हे क्षयरोगाने पछाडलेले असतात. खोकला, अंधत्व, कमजोर दृष्टी या नेहमीच्याच बाबी आहेत. अतिरिक्त ओझी उचलण्यामुळे उतारवयात सांधेदुखी, हार्निया इत्यादीचा त्रास हमालांना जाणवतो. या एकूण परिस्थितीचा परिणाम म्हणून हमाल कामगारांमध्ये मृत्यूचे प्रमाण अधिक असल्याचे म्हटले आहे.

हमालांच्या मुलाखतींच्या आधारे त्यांनी उल्लेख केला की हमालांना मिळणारी मजूरी अल्प असते. हुंडेकरी, व्यापारी यांच्या दडपणाखाली काम करावे लागते. कामामध्ये अपघात झाल्यास नुकसान

भरपाई मिळत नाही. या तुलनेत सरकारी धान्य गुदामामधील परिस्थिती बरी आहे. संघटनेच्या माध्यमातून त्यांच्या ब-याच प्रश्नांची तीव्रता कमी झाली आहे. कामामधील दलाली नष्ट झाली आहे. हमालीचे योग्य पैसे हमालापर्यंत पोहचू शकतात. हा परिणाम केवळ संघटित शक्तीचा आहे, असे नमूद केले.

कौटुंबिक जीवन व आर्थिक पार्श्वभूमी :

बहुतांशी हमाल हे बार्शी, उस्मानाबाद, नगर या दुष्काळी जिल्हयातून स्थलांतरीत झाले आहेत. तसेच भूमीहीन हमालांची संख्याही जाणवण्याइतपत आहे.

डॉ. अवचटांच्या निरीक्षणात आढळलेली महत्त्वपूर्ण बाब म्हणजे हमाली कामाच्या ठिकाणाची जातीयता. बहुतांशी दलित हमाल हे मालधक्क्यावर आढळतात, तर धान्य बाजार व गुदामांमध्ये मराठा जातीचे प्रमाण अधिक आहे. हमालांशी केलेल्या चर्चेमधून त्यांना असे आढळले आहे की, धान्य, वस्तु इत्यादीशी येणारा प्रत्यक्ष संबंध टाळण्यासाठी धान्यबाजारमध्ये व गुदामांमध्ये दलितांना नाकारले जाते.

हमालांचे कौटुंबिक जीवन दारिद्र्याने ग्रासलेले असते. हमालांच्या बायकांमध्ये ॲनिमिक तर मुलांमध्ये न्यूमोनिया, मुडदूस इत्यादी रोगांचे प्रमाण अधिक असल्याचे डॉ. अवचटांनी नमूद केले.

शिक्षण प्रमाण :

हमालांमध्ये व त्यांच्या कुटुंबामध्ये शिक्षण हे अल्प असते.

...१२/-

बहुतांशी हमाल निरीक्षर होते. शिक्षणाच्या अभावामुळे हमालांचे कौटुंबिक जीवन हे अंधश्रद्धेच्या, पारंपारिक रूढीच्या प्रभावाखाली असते, असेही आढळते.

## व्यसनाधीनता :

हमालांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण अधिक आहे. मद्यपींचे प्रमाण हमालांमध्ये अधिक आहे. दारिद्र्य, शिक्षणाचा अभाव व दारूचे व्यसन इत्यादीमुळे हमालांचे कौटुंबिक जीवनाकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे मुलांमध्ये बालमृत्यूचे प्रमाण अधिक असल्याचे त्यांना समजले. तसेच, मुले वाईट सवयी लागून बिघडण्याचेही प्रमाण जास्त असल्याचे आढळले.

## हमाल पंचायतीचे कार्य :

हमाल पंचायतीच्या उभारणीमुळे हमालांच्या ब-याच प्रश्नांची तीव्रता कमी झाली आहे. कामाच्या वेळेची निश्चिती, प्रत्येक कामाचे वेगळे दर, हुंडेकरी व मध्यस्थांचा आणि व्यापारांचा त्रास कमी या सुधारणा हमाल पंचायतीमुळे होऊ शकल्या. तसेच, हमाल पंचायतीने हमालांसाठी स्वस्त दवाखाना, सामान्यांना स्वस्त दरांत जेवणाची सोय, "कष्टाची भाकर" या स्थाने विधायक उपक्रम राबविले आहेत. हमालांसाठी कार्य करताना हमालांमधील सामाजिक जाणिवा वाढविण्याचा प्रयत्न हमाल पंचायतीने केला आहे. त्यासाठी हमाल पंचायतीच्या माध्यमातून "एक गाव: एक पाणवठा", धरणग्रस्तांच्या प्रश्नी मोर्चा इत्यादी सामाजिक चळवळीत हमालांचा सहभाग वाढविला आहे.

उपाय योजना :

डॉ. अनिल अवचट यांनी शेवटच्या विभागामध्ये हमालांच्या समस्यांचा आढावा घेऊन काही उपाय सुचविले आहेत. एकूणच लेखामध्ये डॉ. अनिल अवचट यांनी आरोग्यविषयक समस्या गंभीर मानल्या आहेत. त्यामुळे पगार वाढीचा उपाय सुचवित असतानाच कामाच्या जागेत सुधारणा होणे महत्वाचे मानले आहे. कामाच्या ठिकाणी लाईट, एक्झॉस्ट पंखे, पक्की जमीन, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, हमालांना धुळीपासून संरक्षणासाठी मास्कस इ. उपायांचा डॉ. अवचटांनी उल्लेख केला आहे.

थोडक्यात, डॉ. अनिल अवचटांच्या अभ्यासावरून कामाच्या ठिकाणी घातक गैरसोयी, दारूचे व्यसन - त्यामुळे कुटुंबाची होणारी आर्थिक व मानसिक फरफट, सामाजिक मागासलेपणा, अंधश्रद्धांचे प्राबल्य इत्यादी समस्यांनी हमालांचे जीवन ग्रासलेले दिसून येते.

[३] महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे उपाध्यक्ष श्री. आप्पा कोरपे यांनी "मी तो हमाल" [१९९२] या आत्मकथनातून हमाली व्यवसायातील अनुभव मांडले आहेत. "मी तो हमाल" या आत्मकथनातून लेखकाने आपले कौटुंबिक जीवन, संघटना उभारणी, संघटनेचे कार्य व हमाली व्यवसायातील अनुभव सांगितले आहेत.

प्राथमिक माहिती :

श्री. आप्पा कोरपे यांचे मूळ गांव बीड जिल्हयातील आष्टी

तालुक्यातील भालवणी हे आहे. ते जातीने लिंगायत वाणी असून निरक्षर आहेत.

## कौटुंबिक - आर्थिक पार्श्वभूमी :

लेखकांच्या वडिलांची आर्थिक परिस्थिती गंभीर होती. पाच एकर कोरडवाहू शेती होती. परंतु अवर्षणग्रस्त प्रदेश व भांडवलाच्या अभावी लेखकाचे वडिल शेती करू शकले नाहीत. तसेच घरगुती वाद, यामुळे त्यांनी गाव सोडले. रोजगाराच्या शोधार्थ त्यांच्या कुटुंबाला कधीच स्थैर्य लाभू शकले नाही. आर्थिक दारिद्र्य व आरोग्याची हेळसांड यामुळे त्यांच्या दोन भावंडे व वडिलांचा मृत्यू झाला. आर्थिक आधार नष्ट झाल्याने कधी शेतमजूरी, दुकानदारी, चहाचे हॉटेल, गुरे वळणे तसेच कधी कोंडी खोदण्याचे काम श्री. कोरपे यांनी करुन कुटुंबाचा उदर-निर्वाह चालविला. श्री. कोरपे यांचे आयुष्य कर्जबाजारीपणाने ग्रासलेले होते.

## व्यवसाय स्वीकृती :

इतर मजुरी कामामध्ये स्थिरता नसलेने श्री. कोरपे कामाच्या शोधार्थ अहमदनगरला गेले. त्यांचे हमाली व्यवसायात येणे एक योगायोग आहे. एस्. टी. स्टॅंडवर प्रथम एका प्रवाशाने ओझे उचलावयास लावले व त्यातून त्यांची हमाली सुरू झाली. आजवरच्या कामात प्रथम एस्. टी. स्टॅंड, नंतर शेंग-गिरण व धान्यबाजार अशा निरनिराळ्या ठिकाणी काम केले आहे.

व्यवसाय अनुभव :

हमाली व्यवसायामध्ये हमालांना हुंडेकरी, मुकादम, व्यापारी यांचा त्रास व दबाव सहन करावा लागतो, हे लेखकाने नमूद केले आहे. आलेल्या मजुरीच्या निम्मी रक्कम ही मुकादम, हुंडेकरी उचलत अन्यथा पुढील काम मिळत नसे. रात्रंदिवस व्यापाराच्या मालाची राखण करावी लागत असे. कामाची वेळ निश्चित नसे. हमाली कामाबरोबरच मालकाच्या घरची कामे करावी लागत. सण, उत्सव इत्यादी समारंभ-प्रसंगी व्यापारी, मालक हमालांना राबवून घेत, त्याचा मोबदला मिळत नसे.

व्यसनाधीनता :

आत्मकथनामध्ये हमालांच्या व्यसनाधीनतेचा स्पष्ट उल्लेख नसला तरी हमाल मद्यपान, गांजा ओढणे इत्यादी व्यसने करतात, असे अप्रत्यक्षपणे सुचित केले आहे.

संघटना बांधणी व कार्य :

व्यापारी, हुंडेकरी यांच्या जाचातून मुक्त होण्यासाठी श्री. कोरपे व त्यांच्या सहका-यांनी संघटना बांधण्याचा निश्चय केला. परंतु हमालांमधील निरक्षरता, अज्ञान, मालकांचे दडपण आणि बाजार समितीवरील व्यापा-यांचे वर्चस्व यामुळे संघटना उभारणीमध्ये अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. तसेच वेतन वाढीसाठी काढलेले मोर्चे व संप व्यापा-यांकडून फोडण्याचा प्रयत्न, व्यापा-यांचे इतर व्यापारां

वरील व्दडपण व हमालांमधील आर्थिक दारिद्र्य यामुळे संघटनेची उभारणी मंद गतीने झाली.

संघटना उभारणीमुळे हमालांच्या काही समस्या दूर झाल्या. कामाची वेळ, हमालीचे दर इत्यादीबाबत संघटनेच्या प्रयत्नाने सुधारणा झाली. संघटनेच्या १० वर्षांच्या संघर्षानंतर १९९०पासून हमालांना कायदयाने बोनस, भविष्यनिर्वाहनिधी या सवलती मिळू लागल्या. तसेच संघटनेने भाऊ-भेट, कष्टाची भाकर, घरबांधणी - जमीन खरेदी कर्ज इ. विधायक उपक्रम राबविले आहेत.

आत्मकथनातून हमालीमधील मिळकतीविषयी निश्चित असा उल्लेख आढळत नाही. आज श्री. कोरपे अहमदनगरमध्ये आर्थिक दृष्टया स्थिरस्थावर झाले आहेत. परंतु त्यासाठी त्यांनी कर्ज काढूनच प्रगती केली आहे. तसेच हमालीबरोबर बांगडया विकणे, किराणा दुकान, हॉटेल इ. जोडधंदे केल्याचा उल्लेख आत्मकथनामधून येतो. संघटनेच्या माध्यमातून ते महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाच्या उपाध्यक्ष पदापर्यंत पोहचल्याने याचे श्रेय ते संघटनेला देतात.

[४] "हमाल पंचायत" संघटनेचे संस्थापक, महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ता म्हणून ओळखल्या जाणा-या डॉ. बाबा आढाव यांनी "रविवारसकाळ" [दि. ८. ११. १९८७] मध्ये "कष्टक-यांच्या चार मागण्या" नावाचा लेख लिहिला आहे. असंघटित क्षेत्रातील हमालांच्या समस्या, एकूण कामगारांशी त्यांचे प्रमाण व त्यांच्या मुलभूत गरजा मागण्यांच्या स्वरूपात मांडल्या आहेत.

डॉ. बाबा आढाव यांनी असे मत प्रतिपादन केले आहे की, एकूण कामगारांमध्ये संघटित क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण अल्प आहे. १३ कोटी कामगार हे असंघटित क्षेत्रात आहेत. असंघटित क्षेत्रातील कामगारांना कायद्याचे संरक्षण नाही. कामाची शाश्वती नाही. भविष्यनिर्वाहनिधी, सेवानिवृत्तीवेतन, महागाईभत्ता, विमा योजना इ. संघटित क्षेत्रातील कामगारांना मिळणाऱ्या सवलतीपासून असंघटित क्षेत्रातील कामगार वंचित राहतात.

हमालांबरोबरच असंघटित क्षेत्रातील इतर कामगारांसाठी भविष्यनिर्वाहनिधीची योजना सुरू करण्यासंबंधी डॉ. आढावांनी आग्रह धरला. यामध्ये कामगारांचे दरमहा २५ रु. व तेवढीच रक्कम शासनाने भरावी. भविष्य निर्वाहनिधीमुळे कष्टकरी - असंघटित कामगार वर्गाला पत मिळू शकेल. घरातील आजार, लग्नसमारंभ, मुलांचे शिक्षण, घर बांधणी, अपंगत्व, दुष्काळ अशा संकटामध्ये कामगारांना भविष्यनिर्वाह-निधीचा फायदा होईल. त्याप्रमाणे सावकारी कर्जाच्या जोखडातून ते मुक्त होतील.

असंघटित क्षेत्रातील कष्टकरी कामगारांचे काम हे प्रामुख्याने अंगमेहनतीचे असते. यामध्ये शारीरिक अपघाताची व शरीर कमजोरिची शक्यता अधिक. म्हणून असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी निवृत्तीवेतन व विमायोजना सुरू कराव्यात, जेणेकरून भविष्यातील निवृत्तीनंतरच्या दिशाहीन जीवनामध्ये स्थिरता लाभू शकेल, या दृष्टीने त्यांनी प्रतिपादन केले.

काम असेल तर दाम, कामाप्रमाणे दाम व कामाचे अल्प दर अशा अनिश्चित परिस्थितीमुळे वाढत्या महागाईमध्ये कष्टकरी कामगारांना कुटुंबाचा जीवननिर्वाह चालविणे अशक्यप्राय होऊन बसते. म्हणून शासनाने कष्टकरी, असंघटित कामगारांसाठी स्वस्त धान्य दुकानाऐवजी जीवनावश्यक वस्तूंचे रेशनिंग सुरू करावे म्हणून डॉ. आढावांनी सूचना केली.

डॉ. बाबा आढाव यांनी मांडलेल्या रेशनिंग, सहभागी भविष्यनिर्वाहनिधी, विमा, भूखंड या चार मागण्या महत्वपूर्ण आहेत. अशाच स्वरूपाच्या मागण्या महाराष्ट्रव्यापी शेतमजूर व रोजगार हमी कामगार परिषद आणि महागाईविरोधी कष्टकरी महिला परिषदेने मांडल्या आहेत.

वरील अभ्यासांवरून हे स्पष्ट होते की हमाल हा असंघटित व असुरक्षित कामगार आहे. संघटित कामगारांना उपलब्ध असलेल्या सोयी व सुविधांपासून हमाल हे वंचित आहेत. तसेच त्यांच्या कामाचे स्वरूप हे अस्थायी आहे. साहजिकच कामानुसार वेतन या तत्वामुळे त्यांचे कौटुंबिक जीवन अनेक सामाजिक-आर्थिक समस्यांनी ग्रासलेले आहे. विशेष म्हणजे, पुण्यातील हमालांच्या अभ्यासावरून, हमाली व्यवसायात प्रवेश करणाऱ्यांमध्ये पुण्याच्या शेजारच्या जिल्हयांमधून दुष्काळी परिस्थितीमुळे मूळ गांव सोडलेल्या अल्पभूधारक व भूमिहिनांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे दिसून येते. तसेच, पुण्यातील हमालांचे बरेच प्रश्न त्याच्या संघटनेमुळे सुटले. शिवाय, समाजातील दुर्बल घटकांच्या हिताचे उपक्रमही पुण्याच्या हमाल पंचायतने राबविले आहेत. यावरून,

हमालांच्या वेतन व काम यासंबंधीच्या असुरक्षिततेवर त्यांच्या संघटनेची आवश्यकता, ही बाब महत्त्वाची असल्याचे उघड आहे.

अभ्यास-विषय निवड :

वाहतूक केंद्र, व्यापारी केंद्रे आणि औद्योगिक केंद्रामध्ये हमालीचे काम चालते. मालाची उतराई, भराई, तोलाई [ म्हणजे वजन करणे], गट लावणे, थप्पी लावणे व परताई अशा स्वरूपाचे काम हमालांना करावे लागते. "ओझी उचलणारा तो हमाल" ही साधारण व्याख्या हमालांची केली जाते.

वाढत्या औद्योगिकरणाने व पर्यायाने येणाऱ्या व्यापारीकरणामुळे असंघटित क्षेत्रातील हमाल या कामगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. एकूण अर्थव्यवस्थेतील तो एक महत्वपूर्ण घटक आहे. शेतीमध्ये उत्पादित होणाऱ्या धान्यापासून ते औद्योगिक क्षेत्रातील नवनिर्मित वस्तूपर्यंत हमालांचा संबंध येतो. तरीही आज हमालांकडे कामगार म्हणून पाहिले जात नाही. फिरकोळ अंग मेहनतीची कामे करणारा म्हणून हमालांकडे पाहिले जाते. त्यामुळे संशोधक, अभ्यासक, राज्यकर्ते, प्रशासकीय अधिकारी, कामगार संघटना यांच्याकडून हा वर्ग दुर्लक्षित राहिला आहे.

महाराष्ट्रात, डॉ. बाबा आढावांच्या प्रयत्नांमुळेच १९६९ साली "महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार [नोकरीचे नियमन व कल्याण]" कायदयाची निर्मिती झाली. परंतु प्रत्यक्षात या

कायदयाच्या अंमलबजावणीस १९८० साली प्रारंभ झाला. माथाडी हमाल यासारख्या असंरक्षित श्रमजीवी कामगारांच्या नोकरीचे नियमन करून अशा नोक-यांमध्ये त्यांचा यथोचित व पूर्ण उपयोग व्हावा यासाठी या कायदयाची निर्मिती करण्यात आली. कामाच्या ठिकाणी कामगारांच्या सुरक्षिततेसाठी आणि कामगारांचे कल्याण, आरोग्य यांसाठी उपाय योजणे, नोकरीच्या अटी व शर्ती यासाठी अधिक चांगली तरतूद करणे, टाळता येण्यासारख्या बेकारीस प्रतिबंधक उपाय योजणे, या उद्दिष्टांनी हा कायदा निर्माण झाला. या सर्व कामासाठी मंडळ स्थापणे हे ही कायदयाचे उद्दिष्ट आहे. यानुसार माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाची स्थापना झाली. प्रत्येक हमालाच्या मजुरीच्या ३० टक्के रक्कम व्यापा-यांनी मंडळाकडे भरावयाची असते. यातूनच मंडळाच्या व्यवस्थापनाचा खर्च भागविला जातो. उरलेल्या रकमेतून हमालांना भविष्यनिर्वाहनिधी, नुकसानभरपाई, पगारी सुट्टी, दिवाळी-भेट, पगारी रजा इ. सुविधा पुरविल्या जाव्यात हे उद्दिष्ट आहे. प्राथमिक माहिती व झालेल्या अभ्यासावरून कायदयामुळे हमालांचे वेतन केवळ माथाडी व असंरक्षित कामगार मंडळामार्फत मिळते. परंतु कल्याणकारी योजना, नुकसान भरपाई, पगारी रजा इ. बाबतीत कोणतीही सुधारणा होऊ शकली नाही.

केवळ पुण्यासारख्या ठिकाणी डॉ. बाबा आढावांसारख्या प्रामाणिक सामाजिक कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली हमाल पंचायत उभी राहिल्यामुळे हमालांचे प्रश्न विचारात घेतले जात आहेत. तेथील हमाल पंचायतीने राबविलेले विधायक उपक्रम कायदेशीर बाबींपेक्षा अधिक कल्याणकारी आहेत. परंतु इतरत्र इतक्या प्रभावीपणे हमाल पंचायत उभी राहू शकली नाही. संशोधन, अभ्यासाची गोष्ट तर दूरच. दैनिक वृत्तपत्रे, नियतकालिक इत्यादी मधून त्यांचे प्रश्न क्वचित मांडले जातात.

म्हणूनच हमालांचे सामाजिक-आर्थिक जीवन समजून घेण्याचा प्रयत्न या अभ्यासातून केला आहे. अशा अनेक औद्योगिक - व्यापारी केंद्रापैकी कोल्हापूर शहरातील हमालांच्या सामाजिक-आर्थिक जीवनाचा अभ्यास करण्याचा संकल्प हाती घेतला आहे. हा अभ्यास राजकीय नेते, प्रशासकीय अधिकारी व सर्वसामान्य नागरिक यांच्यापुढे हमालांचे प्रश्न मांडू शकेल, त्याच बरोबर हमालांसाठी विधायक - कल्याणकारी योजना आखण्यासाठी उपयोगी पडू शकेल, असे वाटते.

## कोल्हापूर शहराची वैशिष्टये :

कलानगरी म्हणून प्रसिध्द असलेले कोल्हापूर हे पश्चिम महाराष्ट्रा--तील महानगरपालिकेचे शहर आहे. कलाक्षेत्राबरोबरच कोल्हापूर शहराचे औद्योगिक-व्यापारी क्षेत्रही व्यापक बनले आहे. १९९१ च्या खाणेसुमारी नुसार कोल्हापूरची लोकसंख्या ४, ०५, ११८ इतकी आहे. कोल्हापूर जिल्हयाच्या एकूण नागरी लोकसंख्येच्या २२ टक्के लोकसंख्या कोल्हापूर शहरांमध्ये केंद्रीत झाली आहे. छत्रपति शाहू महाराज यांनी शाहू मिलची उभारणी करून औद्योगिक विकासाला चालना दिली. कोल्हापूर जिल्यातील गूळ उत्पादन व्यवसाय देशामध्ये प्रसिद्ध आहे. छ. शाहू महाराजांनी शाहुपूरी या कोल्हापूरच्या एका विभागामध्ये प्रथम गुळाची बाजारपेठ स्थापन केली. कोल्हापूरची गुळाची बाजारपेठ प्रसिद्ध आहे. कोल्हापूर जिल्हयातील पहिला सहकारी साखर कारखाना कोल्हापूर शहरामध्येच उभा राहिला. अशा प्रकारे कोल्हापूरचे औद्योगिक व्यापारी क्षेत्र विस्तृत बनत गेले. कोल्हापूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे मध्यवर्ती कार्यालय, कोल्हापूर मध्ये आहे. या संस्थेच्या नियंत्रणाखाली शाहू मार्केट यार्ड ही मुख्य बाजारपेठ व आठ उपबाजारपेठा

कार्यरत आहेत. शाहू मार्केट यार्डमध्ये गूळ, भूईमूग, तंबाखू, कांदा, धान्य, कडधान्य व भाजीपाला यांचा विनिमय होतो. या ९ मुख्य बाजारपेठांबरोबरच शहरामध्ये १२ बंदिस्त भाजीपाला बाजार आहेत. याठिकाणी भाजीपाल्याचा विनिमय होतो. कोल्हापूर जिल्हयाच्या एकूण कृषिमालाच्या उलाढालीपैकी ७५ टक्के उलाढाल कोल्हापूर शहरांमध्ये होते. कृषि उत्पन्न बाजार समिती व शाहू मार्केट यार्ड याबरोबरच कोल्हापूर शेतकरी सहकारी संघाचे मध्यवर्ती कार्यालय येथे आहे. कृषिउत्पन्न बाजार समितीच्या स्थापनेपूर्वी व आजही शेतीमालाचा व ग्राहकोपयोगी वस्तूंचा विनिमय शेतकरी सहकारी संघ करीत आला आहे. शेती उत्पादित व इतर वस्तूंच्या आवक जावक व्यवहारासाठी मध्यवर्ती वखार महामंडळाचे शासकीय गोदाम येथे असून येथून अन्नधान्य, कडधान्य, खते, साखर, सिमेंट इत्यादी मालाची आवक-जावक होते. या शासकीय गुदामाबरोबरच शहरामध्ये एकूण ६२ गुदामे आहेत. तसेच कांदा, बटाटा, गूळ, धान्य, कडधान्य इत्यादीचा व्यापार करणारे १६०९ व्यापारी आहेत. धान्य व किराणा दुकाने ८३५ आहेत. शहरामध्ये फळे व भाजीपाल्याची एकूण ६० दुकाने आहेत. तसेच शहराच्या शेजारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सहकार्याने सुमारे १८० छोटे-मोठे कारखाने उभे आहेत. शाहू मार्केट यार्ड या व्यापारी पेठेबरोबरच शाहूपूरी, लक्ष्मीपूरी या शहरातील मोठया बाजारपेठा आहेत. कोल्हापूरमधून गूळ, धान्य, तंबाखू, शेंग, बाजरी, ज्वारी, खाद्यतेल, इत्यादीची निर्यात होते. तर लोखंड, स्टेनलेस स्टील, कोळसा, खते, कापड, औषध, बांधकाम साहित्य, नारळ, धान्य इत्यादीची आयात होते. ही आवक-जावक ट्रक, टेंम्पो तसेच रेल्वे मालगाडीच्या साहाय्याने होते. कोल्हापूरमध्ये माल वाहतूक करणारे

SARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

...२३/-

टेम्पो व ट्रक यांची संख्या सुमारे १५००आहे. यापैकी किमान १००० वाहनांनी रोज मालाची आवक-जावक होते. तसेच कोल्हापूर रेल्वे स्टेशनमध्ये रोज सरासरी ३९ वॅगनमधून मालाची आवक होते. तर रोज सरासरी १९ वॅगनमधून लेव्ही साखरेची जावक होते. मालवाहू रेल्वेबरोबरच कोल्हापूरमध्ये रोज १८ प्रवाशी रेल्वे ये-जा करतात. सातारा, सांगली, मिरज, पुणे, मुंबई, नागपूर या मार्गावर या रेल्वे धावतात. रेल्वे वाहतुकीबरोबरच बसवाहतुकसुद्धा मोठया प्रमाणावर होते. कोल्हापूर आगारच्या २२७ व बाहेरील ८३८ अशा एकूण १०६१ बसेस रोज कोल्हापूर मधून प्रवाशी वाहतूक करतात. अशा या शहरामधील औद्योगिक केंद्रे ही रोजगार निर्मितीची केंद्रे बनली आहेत. अनेक प्रकारचा रोजगार याठिकाणी उपलब्ध होतो. हमाली हा त्यापैकीच एक. \शहरातील वाहतूक केंद्रे, व्यापारी पेठा, धान्यभाजीपाला-बाजार, धान्य गुदाम तसेच रेल्वे स्टेशन या ठिकाणी हमाल काम करतात. शहरामध्ये सुमारे ३५०० हमाल ओझी वाहण्याचे उचलण्याचे काम करतात.

## संशोधन आराखडा :

हमालांच्या सामाजिक-आर्थिक जीवनाच्या अभ्यासासाठी पुढील प्रमाणे संशोधन आराखडयाचा अवलंब केला आहे.

## उद्दिष्टये :

हमालांच्या सामाजिक-आर्थिक जीवनाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टये समोर ठेवण्यात आली आहेत :-

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

१] हमाली व्यवसायामधील स्त्री-पुरूषांचे प्रमाण अभ्यासणे.

२] वयोमानानुसार हमाली व्यवसायातील प्रमाण निश्चित करणे.

३] हमालांचे जातीनुसार वर्गीकरण अभ्यासणे.

४] हमालांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेणे.

५] कामाचे स्वरूप, कामाचे तास, वेतन इत्यादी संबंधीच्या हमालांच्या समस्या समजून घेणे.

६] हमालांमधील व्यसनाधीनतेचे प्रमाण अभ्यासणे.

७] हमालांच्या कुटुंबाच्या सामाजिक-शैक्षणिक परिस्थितीचे परीक्षण करणे.

८] हमालांच्या आर्थिक-पार्श्वभूमीचा आढावा घेणे.

९] हमालांच्या स्थलांतराची व व्यवसाय स्वीकृतीच्या कारणांचा शोध घेणे.

१०] हमालांच्या व्यवसाय अनुभवाविषयी माहिती घेणे.

११] हमालांच्या संघटनेची भूमिका, यंत्रणा आणि उपक्रम समजून घेणे.

१२] हमालांसंदर्भातील कायदयाचे स्वरूप व अंमलबजावणी याचा आढावा घेणे.

## अभ्युपगम [गृहितके] -

सदर अभ्यासासाठी खालील अभ्युपगम [गृहितके] निश्चित करण्यात आली आहेत.

१] अल्पभूधारक व भूमीहीन लोक कुटुंबातील व शेतीवरील अतिरिक्त

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

भारामुळे हमाली व्यवसायामध्ये आले.

२] दुष्काळामुळे ग्रामीण भागातील लोकांनी हमाली व्यवसायाचा स्वीकार केला.

३] लघुउद्योग, कुटीरोद्योग यासारख्या स्वयंरोजगारासाठी भांडवलाचा अभाव असल्यामुळे हमाली हा पर्याय स्वीकारला.

वरील अभ्युपगमांचा [गृहीतकांचा] तथ्ये संकलनासाठी उपयोग करण्यात आला.

अभ्यासाचे क्षेत्र :

हमालांच्या सामाजिक-आर्थिक जीवनाच्या अभ्यासासाठी कोल्हापूर शहराची निवड करण्यात आली. कोल्हापूर शहरामध्ये शाहू मार्केट यार्ड, शाहूपूरी, लक्ष्मीपूरी, रेल्वेस्टेशन, सहकारी संघ या ठिकाणी हमाल केंद्रीत झाले आहेत. कोल्हापूरमध्ये हमालांची संख्या सुमारे ३५०० आहे. हे हमाल धान्य विभाग, गूळ विभाग, भाजीपाला विभाग, वाहतूक विभाग इत्यादी मध्ये काम करतात.

हमालांची निवड करण्यासाठी खालील व्याख्येचा आधार घेतला :-

"हमाल" - व्याख्या :-

सामान्यत: हमाल हा शब्द "मोठी ओझी वाहणारा मजूर"

या अर्थाने वापरला जातो. हमाल या शब्दाची व्याख्या "महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार [नोकरीचे नियमन व कल्याण]" कायदया[१९६९] मध्ये स्पष्ट केली आहे. कामाच्या विभागानुसार १३ प्रकारांची अनुसूची कायदयामध्ये दिली असून त्याआधारे असंरक्षित व माथाडी [हमाल] यांच्या व्याख्या दिल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे -

१] "असंरक्षित कामगार म्हणजे ज्याला कोणत्याही अनुसूचित नोकरीतील कामावर ठेवले असेल किंवा कामावर ठेवावयाचे असेल, असा श्रमजीवी कामगार"

- महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार [नोकरीचे नियमन व कल्याण] कायदा १९६९.

२] "कामगार [माथाडी] म्हणजे कोणत्याही अनुसूचित नोकरीतील श्रमाचे काम करण्याची थेट किंवा कोणत्याही अभिकरणामार्फत [एजन्सी] कामावर ठेवलेली किंवा ठेवण्यात येणारी व्यक्ती - मग तिला वेतनावर ठेवण्यात आलेले असो किंवा नसो - आणि त्या मालकाने किंवा ठेकेदाराने कामावर न ठेवलेले परंतु त्या मालकाच्या किंवा ठेकेदाराच्या परवानगीने किंवा मालकाशी किंवा ठेकेदाराशी केलेल्या करारान्वये काम करणा-या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो. परंतु त्यात

...२७/-

मालकाच्या कुटुंबीयांचा समावेश होणार नाही."

- महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि असुरक्षित
कामगार [नोकरीचे नियमन व कल्याण]
कायदा १९६९.

महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि असुरक्षित कामगार [नोकरीचे नियमन व कल्याण] कायदा, १९६९ मध्ये कामाच्या विभागानुसार दिलेली १३ प्रकारांची अनुसूची खालील प्रमाणे आहे.

<u>अनुसूची - १३ विभाग</u>

१] लोखंड व पोलाद बाजार किंवा दुकान.

२] कापड व कापूस बाजार किंवा दुकान.

३] गोद्यांमधील नोकरी.

४] किराणा बाजार किंवा दुकान.

५] बाजार, कारखाना, आस्थापना.

६] रेल्वे आवार, गुडस् शेड

७] सार्वजनिक वाहतुकीचे वाहन.

८] भाजीपाला बाजार.

९] महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री [नियमन] अधिनियम १९६३ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या बाजारातील किंवा दुय्यम बाजारातील कामगार.

१०] इमारत, लाकूडबाजार, खोकी तयार करणे.

११] मिठागरामधील कामगार.

१२] मच्छिमारीच्या ठिकाणचे कामगार.

१३] अन्न-धान्य गोदाम.

## हमालांची निवड :

प्रस्तुत अभ्यासासाठी कोल्हापूर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाकडे नोंद असलेल्या हमालांचीच निवड केली आहे. कोल्हापूर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाकडे डिसेंबर १९९२ च्या नोंदणीनुसार एकूण २७२८ हमाल आहेत. यापैकी १८० हमाल निरनिराळ्या कारखान्यांमधून काम करतात. हे कारखाने कोल्हापूर शेजारच्या गडमुडशिंगी या खेड्यामध्ये आहेत. अभ्यासाचे क्षेत्र कोल्हापूर असलेने इतर कारखान्यांमधील १८० हमालांचा समावेश अभ्यासामध्ये केलेला नाही. उर्वरित २५४८ हमालांचा अभ्यासामध्ये समावेश करण्यात आला आहे. कोल्हापूर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाच्या नोंदणीनुसार, हे हमाल तीन प्रकारात विभागले आहेत.

| हमालांचे विभाजन | हमालांची संख्या | निवडलेली संख्या |
|---|---|---|
| १. वाहतूक विभाग | ९३९ | ४५ |
| २. कृषि-उत्पन्न-विनमय विभाग | ८४३ | ४२ |
| ३. धान्य बाजार | ७६६ | ३८ |
| एकूण हमाल | २५४८ | १२५ |

अभ्यासासाठी कोल्हापूर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ यांच्याकडे नोंद असलेल्या हमालांचीच निवड करण्यात आली. कारण "महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार [नोकरीचे नियमन व कल्याण]" कायदा, १९६९ अन्वये तरतूद केलेल्या सवलती व नियम केवळ नोंदणीकृत हमालांनाच लागू होतात. अभ्यासाच्या अनेक उद्दिष्टांपैकी एक उद्दिष्ट कायदयाची अंमलबजावणी हे असल्याने १२५ नोंदणीकृत हमालांचीच निवड करण्यात आली. हे प्रमाण एकूण नोंदणी कृत हमालांच्या ५ टक्के आहे. हमालांच्या निवडीसाठी यादृच्छिकनमुना पद्धतीचा वापर केला.

## तथ्य संकलनाचे तंत्र :

[१] सदर अभ्यासाच्या माहिती संकलनासाठी "मुलाखत अनुसूची" या तथ्यसंकलन तंत्राचा उपयोग केला. मुलाखत अनुसूचीचे एकूण अकरा विभाग केले आहेत. पहिल्या विभागामध्ये, हमालांच्या प्राथमिक माहितीविषयीचे [लिंग, वय, धर्म, जात, शिक्षण] प्रश्न आहेत. अनुसूचिचा दुसरा विभाग, कामाच्या स्वरूपाबाबतचा आहे. यामध्ये कामाचे प्रकार / विभाग, कामाचे स्वरूप, वेळ, बेकारी इत्यादी स्वरूपाचे प्रश्न आहेत. तिसरा विभाग, हमालाच्या मासिक उत्पन्नाचा आढावा घेतो. तसेच हमालांचा दुय्यम व्यवसाय व त्यातून मिळणारे मासिक उत्पन्न, यांचाही आढावा घेतो. अनुसूचीचा चौथा विभाग, हमालांमधील व्यसनाधिनतेच्या प्रमाणाविषयी आहे. मुलाखत अनुसूचीच्या पाचव्या विभागामध्ये, हमालांना मिळणाऱ्या सुविधा व सवलतीं

विषयीचे प्रश्न आहेत. अनुसूचीच्या सहाव्या विभागामध्ये हमालांची संघटनेविषयी प्रतिक्रिया समाविष्ट केली आहे. विभाग सात, हा हमालांच्या कौटुंबिक पार्श्वभूमी विषयी आहे. हा विभाग हमालांचा वैवाहिक दर्जा, कुटुंबसदस्यसंख्या, मुलांमधील शिक्षणाचा प्रसार याविषयी आहे. अनुसूचीमधील आठवा विभाग, हमालांच्या आर्थिक पार्श्वभूमीचा निर्देश करतो. विभाग नऊ, हमालांच्या स्थलांतराची पार्श्वभूमी विषयी आहे. विभाग दहा, हा व्यवसायातील अनुभवाविषयी असून, विभाग अकरामध्ये हमालांच्या उपाययोजनाबाबतच्या प्रतिक्रियांची नोंद घेतली आहे.

अशा प्रकारे सामाजिक-आर्थिक जीवनाचा सर्वांगीण अभ्यास करण्याच्या दृष्टीकोनातून मुलाखत अनुसूची परिपूर्ण बनविण्याचा प्रयत्न केला आहे.

[२] हमालांच्या मुलाखतींबरोबर शहरामधील हमाल संघटना पदाधिका-यांच्याही मुलाखती घेतल्या आहेत. या मुलाखतींमधून संघटनेची उभारणी, संघटनेचे यश-अपयश, संघटनेचे विधायक उपक्रम आणि उपाय योजना याविषयी माहिती संकलित केली आहे.

[३] कोल्हापूर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाच्या प्रशासकीय अधिका-यांच्या मुलाखतीमधून मंडळाचा उद्देश, त्यामधील यश-अपयश, अडचणी आणि हमालांच्या समस्या निवारण्यासाठीच्या उपाययोजना याविषयी माहिती घेतली आहे.

प्रतिसादकांचा प्रतिसाद :

सदर अभ्यासासाठी हमालांना प्रत्यक्ष भेटून मुलाखत - अनुसूचीद्वारे माहितीचे संकलन केले आहे. माहितीचे संकलन हे माहे एप्रिल, मे, जून व ऑक्टोबर ९३ या चार महिन्यांच्या कालावधीत केले आहे. मुलाखती साठीची वेळ निवडताना सकाळी १० पर्यंत अथवा संध्याकाळी ५ च्या पुढे अशी ठेवावी लागली. कारण मध्यंतरीचा वेळ कामाचा असलेने हमाल मुलाखतीसाठी उपलब्ध होण्याची शक्यता कमी होती. मुलाखतीस हमालांचा प्रतिसाद हा संमिश्र स्वरूपाचा होता. बहुतांशी हमालांनी मुलाखती उत्स्फूर्तपणे दिल्या. कामाची सविस्तर माहिती दिली. याबाबतीत दीर्घ अनुभव असलेल्या हमालांशी केलेली चर्चा मोलाची ठरली. मुलाखतीस मिळालेल्या चांगल्या प्रतिसादाबरोबरच अडचणीही उद्भवल्या. अपरिचित व्यक्तीला माहिती देण्यात हमालांना असुरक्षितता वाटायची. परंतु याकामी हमाल पंचायत व कोल्हापूर जिल्हा माथाडी कामगार युनियन या संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या सहकार्यामुळे त्या अडचणी दूर करता आल्या. व्यसनाधीनतेविषयी माहिती घेताना सर्वच हमालांनी खरी माहिती पुरविली असण्याची शक्यताही कमी दिसते. कारण संघटना प्रतिनिधींशी चर्चा करता व्यसनाधीनतेचे प्रमाण जास्त असल्याचे सांगण्यात आले. व्यसनाधिनतेविषयीच्या काही प्रश्नांना हमालांनी प्रतिसाद दिला नसल्याने वस्तुस्थिती समजू शकली नाही. हमालांच्या समस्या, सामाजिक-आर्थिक जीवन याविषयी अभ्यास होत आहे, याचे हमालांना कौतुक वाटले. त्या प्रमाणेच या अभ्यासातून काही निष्पन्न होणार आहे का? असा प्रतिसवालही त्यांचा होता. मालक व व्यापारी

यांच्याविषयीची मते सर्वांकडून स्पष्टपणे नोंदली, असे म्हणता येणार नाही. त्याचप्रमाणे संघटनेचे कार्य, कायदे याविषयी निम्म्याहून अधिक हमालांनी प्रतिसाद दिला नाही. तरी आवश्यक माहिती संघटना कार्यकर्ते व अनुभवी हमाल यांच्या मदतीने मिळविता आली. त्यामुळे निवडलेल्या अभ्यास विषयीची माहिती संकलित करणे शक्य झाले.